क्रमांक : ९३८१ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : ०५ मे, २०२२.

**संदर्भ :- १) या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक ३१०३०/क-१, दिनांक ४ डिसेंबर, २०१८.**
**२) या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक १६०६०/क-१, दिनांक २१ ऑक्टोबर, २०२१.**

**:: परिपत्रक ::**

या सचिवालयात उप सचिव व त्यावरील पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, कार्यालयीन कामकाजाच्यादृष्टीने या सचिवालयातील उप सचिव व त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र विधानमंडळ समित्यांचे मुंबई बाहेरील अभ्यास दौरे करु नयेत असा निर्णय मा.मंडळाने माहे डिसेंबर, २०१८ मध्ये घेतलेला आहे. या संदर्भात संदर्भाधीन परिपत्रकांन्वये उप सचिव व त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे. तथापि, काही उप सचिवांमार्फत मा.मंडळाच्या सदर निर्णयाचे पालन होत नसल्याचे आढळून आले आहे.

त्यानुषंगाने उप सचिव व त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांनी मुंबई बाहेरील अभ्यास दौरे न करण्याबाबत मा.मंडळाने घेतलेल्या निर्णयासंबंधीची संदर्भाधीन परिपत्रके उप सचिव यांच्या पुन्हा निदर्शनास आणण्यात येत आहेत. मा.मंडळाच्या सदर निर्णयांचे या सचिवालयातील उप सचिव यांचेकडून पालन होणे अपेक्षित आहे. तसेच सर्व समिती कक्षांनी मुंबई बाहेरील समितीच्या दौऱ्यात अधिकारी / कर्मचारी यांच्या नावाच्या प्रस्तावाची नस्ती सादरीकरणावेळी मा.मंडळाच्या निर्णयानुसार कार्यवाही करावी.

(सुभाष नलावडे)
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
२) मा.उप सभापती/ मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३) मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा/विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
५) सह सचिव (समिती) तथा विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व उप सचिव.
७) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.
८) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (संकेतस्थळावर अपलोड करण्याकरिता).
९) निवडनस्ती.

\\MLS-DATASERVER\C Branch\१४०१\C-१०१\Local Disk (d)\E Drive\२०२२\Circular\Circular.doc